MHLA050001152019

नियमीत दरखास्त क्र.०१/२०१९
बापुराव वि. मच्छींद्र

**<u>नि.क्र.३७ खालील आदेश</u>**

**०१.** सदरकामी युक्तीवाद करण्यापुर्वी जाबदारतर्फे विधीज्ञ श्री. यु.के. घोगंडे यांनी नमूद केले आहे की, जाबदार क्र.२ ही पुर्वीच मयत असून तिच्या मृत्युचा उतारा आणि पुरसीस न्यायालयाच्या पटलावर आहे. त्याची पुर्तता अर्जदाराने केलेली नाही. यापुर्वी नि.क्र.२४ लगत जाबदार क्र.२ खुशावर्ता मयत असल्याचे आणि तिचा मृत्यु दाखला सादर केल्याचे दिसून येते. हुकूमनामा वाटपाचा असल्याने सदर खुशावर्ता हिचे कायदेशीर प्रतिनिधी किंवा वारस पटलावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे, सदर अर्ज निर्णीत करण्यापुर्वी अर्जदाराने तजवीज करावी.

**०२.** दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २१ यास क्रम २२ लागू नसल्याने थेट वारस पटलावर आणता येतील. सबब, त्याबाबत तातडीने पुर्तता अर्जदाराने करुन वारस पटलावर आणल्यावर त्यांचे म्हणणे या अर्जावर घेवून त्यानंतर आदेश पारीत करता येतील. सबब, निर्देश दिल्याप्रमाणे जाबदार क्र.२ यांचे वारस पटलावर आणावेत.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर

दिनांक:१६/०३/२०२६.